**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)**

**सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांची दुरूस्ती, देखभाल, व्यवस्थापन व सुशोभीकरण मोहिम दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीत राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय, क्रमांक : स्वमअ-२०१७/प्र. क्र. १२३ /नवि-३४**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग

४ था मजला, मंत्रालय, मुंबई

दिनांक : ३१ ऑक्टोबर, २०१७.

**पहा :**

१. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांक स्वभाअ २०१५/प्र.क्र.२३/नवि-३४, दिनांक १५ मे, २०१५.
२. स्वच्छ महाराष्ट्र अभियान संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक राअसं/कार्यान्वयन सूचना/४२/१५-१६ दिनांक २८ जुलै, २०१५.
३. शासन परिपत्रक, क्रमांक स्वमअ-२०१७/प्र.क्र. ७४/नवि-३४, दिनांक २३ मे, २०१७.
४. शासन परिपत्रक, क्रमांक स्वमअ-२०१५/प्र.क्र. २४८/नवि-३४, दिनांक १६ ऑगस्ट, २०१७.

**शासन निर्णय**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी दिनांक १५ मे, २०१५ पासून संपूर्ण राज्यात "मिशन मोड" पध्दतीने सुरू आहे. या अभियानांतर्गत शहरे **"हागणदारी मुक्त"** करणे व घनकचरा व्यवस्थानातंर्गत **"स्वच्छ"** करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे. या अभियानांतर्गत कार्यवाही करून दिनांक २ ऑक्टोबर, २०१५ पासून टप्याटप्याने शहरे हागणदारी मुक्त करण्याची कार्यवाही सुरू झाली व दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ रोजी मा. राष्ट्रपती महोदयांच्या उपस्थित झालेल्या कार्यक्रमात राज्याचा संपूर्ण नागरी भाग हागणदारी मुक्त झाल्याचे मा. मुख्यमंत्री महोदयांनी घोषीत केले आहे. राज्यातील शहरांचा "हागणदारी मुक्त शहर" हा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी या शहरांमध्ये **"OD Watch"** सुरू ठेवण्यात आलेला आहे.

२. राज्यातील शहरे हागणदारी मुक्त करताना लाभार्थ्यांना वैयक्तीक घरगुती शौचालय (IHHL) उपलब्ध करून देण्याबरोबरच शहरांमध्ये अस्तित्वात असलेल्या सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांचा वापर करण्याबाबत लाभार्थ्यांना प्रवृत्त केले आहे. राज्यातील शहरांचा "हागणदारी मुक्त शहर" हा दर्जा

टिकविण्यासाठी या सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांची स्थिती चांगली व वापरायोग्य असणे आवश्यक आहे. शहरांमधील सामुदायीक व सार्वजनिक शौचालयांची स्थिती चांगली नसल्याबाबत बऱ्याचवेळा प्रसार माध्यमातून टिकाही होत असते. यास्तव, हागणदारी मुक्त शहराचा दर्जा कायम राखून त्यामध्ये सातत्य राखण्यासाठी सामुदायीक व सार्वजनिक शौचालयांची दुरूस्ती, देखभाल, व्यवस्थापन व सुशोभिकरण करण्यासाठी राज्यामधील **सर्व शहरांमध्ये दिनांक १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत "सामुदायीक / सार्वजनिक शौचालय देखभाल, दुरूस्ती, व्यवस्थापन व सुशोभिकरण मोहिम" राबविण्यास शासन मान्यता देत आहे.**

**(अ) <u>सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांची देखभाल, दुरूस्ती, व्यवस्थापन व सुशोभिकरण मोहिमेअंतर्गत करावयाची कामे:-</u>**

**(१) सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांची पाहणी:**

शहरामध्ये असलेल्या सर्व सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांच्या सद्य:स्थितीची पाहणी करणे. सदर सद्य:स्थिती पाहणी करताना पुढील बाबीं तपासण्यात याव्यात:-

- लाभार्थ्यास शौचालयांपर्यंत सुलभतेने पोहचता यावे यासाठी चांगला मार्ग उपलब्ध आहे काय?
- शौचालयांचा परिसर स्वच्छ आहे किंवा कसे?
- शौचालयात विजेची व पुरेश्या पाण्याची उपलब्धता आहे किंवा कसे ?
- शौचालयांचे दरवाजे व शौचकुपाची भांडी सुस्थितीत व वापरण्यायोग्य आहेत काय ?
- शौचालयांच्या देखभाल व दुरूस्तीसाठीची व्यवस्था करण्यात आली आहे काय?

**(२) सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती:**

- उपरोक्त प्रमाणे पाहणी केल्यानंतर, ज्या सामुदायीक/ सार्वजनिक शौचालयांचा वापर करण्याबाबत अडचणी/समस्या/त्रुटी आढळून आल्या आहेत अशा शौचालयांचा दुरूस्ती बाबत खाली नमूद केलेल्या कालबध्द कार्यक्रम आाखून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

| अ.क्र. | कालावधी | बाब |
|---|---|---|
| १ | दिनांक १ ते ५ नोव्हेंबर, २०१७ | शहरातील सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांच्या सद्य:स्थितीची पाहणी करणे. अशा प्रकारे पाहणी करताना शौचालयांच्या सद्य:स्थिती बाबतची जिओ-टॅग छायाचित्रे काढून ठेवण्यात यावीत. |
| २ | दिनांक ६ ते १२ नोव्हेंबर, २०१७ | पाहणीमध्ये आढळून आलेल्या स्थितीच्या अनुषंगाने आवश्यक दुरुस्त्या करून घेण्यासाठी आराखडे व अंदाजपत्रक तयार करून, त्यास आवश्यकतेनुसार तांत्रिक मान्यता घेणे. |
| ३ | दिनांक १३ ते २२ नोव्हेंबर, २०१७ | वरील प्रमाणे तयार केलेल्या दुरूस्तीच्या आराखडे व अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता घेणे.<br>या मोहिमेचे महत्व विचारात घेता जिल्हाधिकारी कार्यालयाने नगरपरिषद / नगरपंचायत यांच्याकडून प्राप्त झालेल्या आराखडे व अंदाजपत्रकास ८ दिवसात प्रशासकीय मान्यता देणे बंधणकारक राहील. |
| ४ | दिनांक २३ ते ३० नोव्हेंबर, २०१७ | ज्या बाबीसाठी निविदा काढणे आवश्यक आहे अशा बाबींसाठी निविदा काढणे. |
| ५ | दिनांक १ ते ३१ डिसेंबर, २०१७ | निविदेतील पात्र कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देवून आराखडे व अंदाजपत्रकानुसार दुरूस्तीची कामे करून घेणे.<br>अशी कामे पूर्ण झाल्यानंतर पूर्ण झालेल्या कामांची जिओ-टॅग छायाचित्रे काढून ठेवण्यात यावीत. |

**(३) सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांचे देखभाल व्यवस्थापन:**

- शहरातील सामुदायीक/सार्वजनिक शौचालये देखभाल/दुरुस्ती अभावी वापरण्यायोग्य राहत नाहीत. यास्तव, वरील प्रमाणे दुरूस्त करून घेतलेल्या तसेच शहरातील चांगल्या स्थितीत

असलेल्या सामुदायीक/सार्वजनिक शौचालयांची नियमितपणे देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी सुयोग्य अशा संस्थांसोबत करार करून देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात यावी. अशा प्रकारे जबाबदारी सोपविताना शहरातील महिला बचत गटांचा प्राधान्याने विचार करावा.

- सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांच्या एकूण सीटपैकी किमान एक सीट दिव्यांगांना वापरण्यासाठी, त्यामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्यात यावेत.

(४) **सामुदायीक /सार्वजनिक शौचालयांचे सुशोभीकरण:**

- शहरातील नागरिकांना उघड्यावर शौचास जाण्यापासून परावृत्त करण्यासाठी व नागरिकांनी सामुदायीक/सार्वजनिक शौचालयांचा नियमितपणे वापर करण्यासाठी सामुदायीक/ सार्वजनिक शौचालयास रंग देणे, शौचालयाचा परिसरात चिखल होवू नये म्हणून सामुदायीक / सार्वजनिक शौचालया भोवती व जाण्या येण्याच्या मार्गावर कॉंक्रीटीकरण करणे इत्यादी कामे करावीत.

**(ब) <u>सामुदायीक / सार्वजनिक शौचालय देखभाल, दुरूस्ती, व्यवस्थापन व सुशोभिकरणासाठी करावयाचा खर्च :-</u>**

- शहरांतील सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांची दुरूस्ती, देखभाल, व्यवस्थापन व सुशोभिकरण यासाठी येणारा खर्च पुढे नमूद अनुदानातून भागविण्यात यावा.:-

(अ) स्वच्छ भारत अभियानावर खर्च करण्यासाठी राखून ठेवलेल्या १४ वित्त आयोगाच्या ५० टक्के निधी.

(ब) १४ वा वित्त आयोगाचा प्रोत्साहन निधी.

(क) शहर हागणदारी मुक्त झाल्यानंतर मिळालेला प्रोत्साहन निधी.

(ड) उत्कृष्ट नगरपरिषद/ नगर पंचायतीसाठी देण्यात आलेला बक्षिसाचा निधी.

(इ) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा स्व: निधी.

(ई) कार्पोरेट सामाजिक दायीत्व (CSR) अंतर्गत उपलब्ध निधी

३. उपरोक्त नमूद केलेल्या सूचनांनुसार शहरामधील सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांची दुरूस्ती, देखभाल, व्यवस्थापन व सुशोभिकरण याबाबतची कामे पूर्ण करण्यात आल्यानंतर संबंधित आयुक्त, महानगरपालिका यांनी स्वत: पाहणी करून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा. तर, मुख्याधिकारी यांनी त्यांचा अहवाल संबंधित जिल्हा प्रशासन अधिकारी यांच्याकडे पाठवून त्याची प्रत विभागीय प्रादेशिक उपसंचालक, नगरपालिका प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय व शासनास पाठविण्यात यावी.

४. जिल्हयामधील नगरपरिषदा / नगरपंचायतींमध्ये या मोहिमे अंतर्गत होणाऱ्या कामांची पाहणी/ तपासणी जिल्हा प्रशासन अधिकारी यांनी व विभागातील कामांची पाहणी/ तपासणी प्रादेशिक उपसंचालक, नगरपालिक प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय यांनी या अभियान काळात वेळोवेळी करावी. तसेच, जिल्हयामध्ये / विभागामध्ये घेण्यात आलेल्या कामांचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

५. स्वच्छ भारत अभियान हा मा. पंतप्रधान व मा. मुख्यमंत्री महोदयांचा फ्लॅगशिप कार्यक्रम आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने वरील प्रमाणे दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची सर्व संबंधितानी दक्षता घ्यावी, अन्यथा संबंधितांवर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घेण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०३११७१२४१३२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhakar Dnyandeo Bobade

Digitally signed by Sudhakar Dnyandeo Bobade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bc1634ab95abe4652ec2433f0ccd505c20ea3e7ecad3bfcb55d49ad9dbd0fe5e, serialNumber=2e4705465b9bdfd5b38b2d36aae83659869796cb8cc2aefbc550989feec27db1, cn=Sudhakar Dnyandeo Bobade
Date: 2017.10.31 17:02:11 +05'30'

**(सुधाकर ज्ञा. बोबडे)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२. मा .मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव (सर्व), मंत्रालय, मुंबई
४. मा .राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व), मंत्रालय, मुंबई
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
६. विभागीय आयुक्त, महसूल विभाग (सर्व).
७. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
८. जिल्हाधिकारी, सर्व
९. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
१०. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व).
११. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई.
१२. निवडनस्ती, नवि-३४.